अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर

दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) विभाग

कंत्राटी तत्वावरील " समुदाय संघटक " पदासाठी भरती प्रक्रिया

जाहिरात

अहमदनगर महानगरपालिकेमधील दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत समुदाय संघटकांची पदे ठोक मानधनावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने थेट मुलाखत (Walk in interview) द्वारे भरण्यात येणार आहे. सर्व संबधित उमेदवारांनी किमान शैक्षणिक अर्हता धारण करत असल्यास आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रसह जाहिरातीत दिलेल्या तारखेस जाहिरातीमधील विहीत नमुन्यात अर्जासह उमेदवारांनी थेट मुलाखत (Walk in interview) करिता दिलेल्या तारखेस उपस्थित रहावे. जाहिरातील मधील विहीत नमुन्यातील अर्ज अहमदनगर महानगरपालिकेच्या www.amc.gov.in संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा.

**मुलाखतीची दिनांक** - अहमदनगर महानगरपालिका, नगर औरगाबाद रोड, पावन गणपती शेजारी,अहमदनगर येथे **वार - शुक्रवार दिनांक १०/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा.**

१) पदाचा तपशील-

| अ क्र | पदाचे नाव | पदाची संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता | अनुभव व प्राधान्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | समुदाय संघटक मासिक मानधन रु. १५०००/- प्रतीमहा | ३ | अ.जा -१<br>खुला प्रवर्ग-२<br>एकुण-३ | १(किमान १२ वी पास<br>२.(संगणकामधील MS office( word , Excel, power point) यांचे ज्ञान असलेले /MSCIT प्रमाणपत्र | १ समाज विकास क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहिल.<br>२ विशेषतः शहरी दारिद्रय रेषे खालील कुटुबा तील व्यक्तीस प्राधान्य |

२) वयोमर्यादा- उपरोक्त पदांसाठी दिलेल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय थेट मुलाखत (walk in interview) च्या तारखेस किमान १८ वर्ष पुर्ण असणे आवश्यक राहील. तसेच कमाल वयोमर्यादा आरक्षित पदानुसार शासन निर्णयाप्रमाण राहिल. उमेदवारांनी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना/ राष्ट्रीय नागरी उपजिविका योजनोमध्ये किमान ३ वर्ष काम केलेले असल्यास वयामध्ये ५ वर्ष शिथीलक्षम राहिल.

३) उमेदवारांने महानगरपालिकेच्या www.amc.gov.in या संकेतस्थळावर विहित नमुन्यातील अर्ज डाऊनलोड करुन स्वाक्षरीसह अर्ज भरुन त्यासोबत जन्म तारखेकरिता ( जन्म प्रमाणपत्र/ वय व अधिवास प्रमाणपत्र/१० वीचा शाळा सोडल्याचा दाखला) जातीचा पुरावाकरिता (जातीचा दाखला/ १० वीचा शाळआ सोडल्याचा दाखला ) १२ वीचे शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र/ गुणपत्रिका, सामाजिक क्षेत्रातील किमान ५ वर्षाचा अनुभवाचा दाखला फोटो आयडीसाठी मतदान ओळखपत्र/ आधारकार्ड/ पॅनकार्ड, उमेदवाराचा अलीकडील काळातील रंगीत पासपोर्ट साईज २ फोटो, स्वयघोषणा पत्र, लहान कुटुंब प्रमाणपत्र इत्यादी वरील व आवश्यक कागदपत्रांवर स्वः स्वाक्षरी करुन साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक राहिल. अर्जात नमुद विहित ठिकाणी उमेदवाराचा अलीकडील रंगीत पासपोर्ट साईज फोटो ( ३.५ बाय ४.५ सेमी साईज) चिटकवुन त्यावर स्वाक्षरी करावी. अर्जाची व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या मुलाखतीसाठी छायांकित ३ प्रती व मुळ दस्तऐवज पडताळणीसाठी मुलाखलीच्या दिवशी घेऊन समक्ष उपस्थित रहावे.

४) आरक्षण- मागासवर्गीय आरक्षित पदांसाठी अर्जासाठी जातीचा दाखला अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल. याबाबतचे अंतिम अधिकार आयुक्त , अहमदनगर महानगरपालिका यांना आहे.

५) स्वयंघोषणापत्र- महानगरपालिकेक़ डे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयी प्रकरण व तत्सम इत्यादी कारवाई संबधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. याबाबत स्वयंघोषणा पत्र देण्यात यावे. सदर माहिती न दिल्यास उमेदवारांची सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना राहिला.

६) लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन- महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ नुसार जाहिरातीसोबत जोडलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

७) मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा खर्च उमेदवारांना दिला जाणार नाही.

८) प्रस्तृत जाहीरातीला अनुसरुन अटी- शर्ती प्रमाणे विहीत केलेली दिनांक, वेळ व अटी- शर्तीत बदल करण्याचे अधिकार आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना आहे.मुलाखतीत निवड झालेल्या उमेदवारीची यादी मनपाच्या www.amc.gov.in या संकेतस्थळावर / नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

९) उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१०) नियुक्ती झालेल्या उमेदवारांस अहमदनगर महानगरपालिकेमधील सेवेत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

११) नियुक्ती झालेल्या उमेदवारांस ११ महिन्याकरिता पुर्णतःकंत्राटी व मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात येईल.

१२) नियुक्तीस पात्र झालेल्या उमेदवारांस १००/- रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर करारपत्र सादर करावे लागेल.

१३) समानगुण असणा-या उमेदवारास गुणात्मक क्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिमं/१२१५/(प्र.क्रत५५/१५) /१३अ दिनांक ५ ऑक्टोबर २०१५ मधील नमुद केलेल्या निकषावर नियुक्ती देण्यात येईल.

१४)प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थाबविण्याचा अधिकार आयुक्त , अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना आहेत.

१५) उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाब आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

उपायुक्त (कर)

अहमदनगर महानगरपालिका

## लहान कुंटुबांचे प्रतिज्ञापत्र-

**प्रतिज्ञापन**

**नमुना " अ" (नियम ४ पहा)**

मी ............................................... श्री. ........................................यांचा/ यांची मुलगा/ मुलगी/पत्नी, वय वर्ष , राहणार ..................................ता ............, जि ........................... याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१) मी समुदाय संघटक या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला .............. (संख्या) इतकी ह्यात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... आहे. असल्यास दिनांक -----/-----/------ ( असल्यास , दिनांक नमुद करावा.)

३) ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या , मुलामुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण -
दिनांक-

अर्जदारांचे नाव व सही

**स्वयंघोषणपत्र**

मी ठिकाण जि. असे प्रमाणित करतो / करते की, मी अहमदनगर महानगरपालिका , DAY-NULM योजने अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपातील मानधन तत्वावरील ' समुदाय संघटक' या पदासाठी विहीत नमुन्यातील अर्ज सादर केलेला आहे. त्यामधील माहिती खरी असुन त्यासोबत आवश्यक दस्तऐवज सादर केलेले आहे. जाहीरातील अटी, शर्ती मधील दस्तऐवजाच्या आधारे मी अर्ज सादर केला आहे. तसेच माझ्यावरती न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण व तत्सम कारवाई चालु नसल्यांचे मी हे स्वयघोषणा पत्र देत आहे.

याबाबत भविष्यात अडचण उपलब्ध झाल्यास माझी सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात यावी आणि याबाबत झालेल्या कार्यवाहीस मी वैयक्तीक जबाबदार राहील.

ठिकाण -
दिनांक

अर्जदारांचे नाव व सही

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

दिनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान ( DAY-NULM)

कंत्राटी तत्वावरील ' समुदाय सघटक ' पदा करिता अर्ज

प्रति,
मा. आयुक्त साहेब,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

१) अर्जदार नाव आडनाव प्रथम : -

२) लिंग :- स्त्री / पुरुष ३) जन्मदिनांक

४) दिनांक / /२०२१ रोजीचे वय वर्ष महिने दिवस

५) संपुर्ण पत्ता

तालुका जिल्हा पिन कोड

६) मोबाईल क्रमांक ७) ईमेल

८) खुल्या प्रवर्गातील आहे काय? होय / नाही.

९) शैक्षणिक पात्रता

| अ क्र | शैक्षणिक पात्रता व सगणकीय पात्रता | परिक्षा मंडळ/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेल्या गुणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

१०) अनुभवाचा तपशील- शासकीय /अशासकीय नोदणीकृत समाज विकास संस्थेमधील कामाचा अनुभव देण्यात यावा.

| अ क्र | संस्थेचे नाव,ठिकाण व पदाचे नाव | कालवधी दिनांक | | एकुण वर्ष व महिन |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

११) अवगत असणारी भाषा - मराठी / हिंदी /इग्रजी/ अन्य

१२) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ, प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग प्रकरण वा तत्सम इत्यादी कार्यवाही चालु आहे काय ? ( सोबत स्वयंघोषणा पत्र दिले आहे.) होय/ नाही

१३) उमेदवार शहरी दारिद्रय रेषेखालील आहे का ? होय /नाही

१४) अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी आहे होय /नाही

१५) मी असे प्रमाणिक करतो/ करते की, वर नमुद केलेली माहीती खरी असुन , ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण
दिनांक

अर्जादाराचे नाव व स्वाक्षरी